# शेतकऱ्यांना स्वातंत्र्य मिळालंय का ?

मित्रांनो, आपल्याला स्वातंत्र्य मिळून जवळपास ७९ वर्षे झाली. आपल्याला विचार करण्याचे स्वातंत्र्य, जगण्याचे स्वातंत्र्य, बोलण्याचे स्वातंत्र्य, व्यापाराचे स्वातंत्र्य मिळाले, असे बोलले जाते. पण हे खरे स्वातंत्र्य शेतकऱ्याला मिळाले का?

स्वातंत्र्याचा खरा अर्थ म्हणजे सन्मानाने जगण्याचे स्वातंत्र्य. या ७९ वर्षांच्या काळात शेतकऱ्यांना खऱ्या अर्थाने सन्मानाने आणि स्वाभिमानाने जगण्याचे स्वातंत्र्य मिळाले का, हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. ब्रिटिश काळातदेखील लोक जगत होते. परंतु त्या काळातील अनिष्ट प्रथांमुळे शेतकऱ्यांची लूट होत होती. लगान वसुली केली जात होती. व्यापाराचे स्वातंत्र्य त्या काळातही नव्हते आणि आजही नाही. आजदेखील शेतकऱ्यांकडून वेगवेगळ्या माध्यमांतून वसुली सुरू आहे. त्याला बाजारपेठेचे स्वातंत्र्य नाही. त्याच्या मालाचा भाव त्याला स्वतःला ठरवता येत नाही. मग खऱ्या अर्थाने शेतकरी स्वतंत्र झाला का? आपल्या संविधानामध्ये महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा अधिकार दिला. त्याचबरोबर काही अधिकार आणि कर्तव्येही अधोरेखित केली. परंतु आजच्या परिस्थितीत शेतकऱ्याला त्याच्या कर्तव्याची जाणीव करून दिली जाते; मात्र त्याच्या अधिकारांच्या बाबतीत कोणीच बोलायला तयार नाही. प्रत्येक गोष्टीसाठी या माणसाला संघर्ष करावा लागतो. त्याला व्यवसाय करण्याचे स्वातंत्र्य आजही नाही. शेतीसाठी पूरक अशा मूलभूत सुविधा आजही शासन उपलब्ध करून देत नाही. अगदी वीज आणि पाण्यासारख्या प्राथमिक गरजाही त्याच्या पूर्ण होत नाहीत. मार्केटिंगची व्यवस्था नावापुरतीच राहिली आहे. बाजार समित्या आता शेतकऱ्यांसाठी कत्तलखाने ठरत आहेत, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी उत्पादित केलेल्या मालाचा भाव ठरविण्याचा अधिकार त्याला नाही. सरकार हमीभावाला कायदेशीर आधार देत नाही. शेतीला उद्योगाचा दर्जा मिळावा, अशी मागणी सातत्याने होत असली, तरी शेतीकडे उद्योग म्हणून पाहिले जात नाही. कारखानदारांना सहजासहजी त्यांच्या ऐपतीपेक्षा जास्त कर्ज मिळू शकते आणि ते बुडवले तरी त्यातून मार्ग काढला जातो. परंतु शेतकऱ्याकडे असलेल्या संपत्तीच्या प्रमाणातदेखील त्याला कर्जपुरवठा होत नाही. स्वाभाविकच तो स्पर्धेत टिकू शकत नाही.

### अतिथी संपादकीय

## ॲड. अजित बबनराव काळे

**उच्च न्यायालय खंडपीठ, छत्रपती संभाजीनगर**
**उपाध्यक्ष, शेतकरी संघटना, महाराष्ट्र राज्य**

शेतीसाठी आवश्यक असलेली प्रत्येक वस्तू खरेदी करताना शेतकऱ्याला जीएसटी भरावा लागतो; परंतु त्या जीएसटीचा परतावा मिळण्याची कोणतीही व्यवस्था त्याच्यासाठी नाही. व्यापारी आणि कारखानदार आपल्या उत्पादनावर झालेल्या खर्चाचा पै-पैचा हिशोब लावतात, त्यावर स्वतःचा नफा जोडतात आणि त्यानुसार उत्पादनाची किंमत ठरवतात. या प्रक्रियेला कायदेशीर संरक्षणही मिळते. परंतु शेतमालाच्या बाबतीत अशी व्यवस्था निर्माणच झालेली नाही. उत्पादन खर्चावर आधारित भाव ठरविण्याची प्रभावी आणि कायदेशीर प्रक्रिया या देशात निर्माण झाली नाही. एक ना अनेक समस्यांमध्ये शेतकरी अडकलेला आहे. आज समाजातील इतर घटकांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे त्यांच्या श्रमाचा मोबदला मिळतो आणि त्याला कायदेशीर हक्काची जोडही दिली जाते. परंतु समाजातील अत्यंत महत्त्वाच्या या घटकाला मात्र स्वतःच्या मेहनतीचा भाव ठरविण्याचाही अधिकार नाही. ज्या माणसाच्या कष्टावर हा संपूर्ण समाज जगतो, तोच माणूस दुर्लक्षित आहे. स्वातंत्र्यानंतर संघटन करण्याचे स्वातंत्र्य जरी मिळाले असले, तरी संघटित न होण्याची परिस्थिती या देशातील भांडवलशाही आणि राजकीय व्यवस्थेने निर्माण केली. त्यामुळे मोठ्या संख्येने असलेला हा समाज स्वतःच्या हक्कांसाठी संघटितपणे लढू शकत नाही. शासकीय धोरणेच त्याला संघटित होऊ देत नाहीत. त्यामुळे खऱ्या अर्थाने शासनाची भूमिका यामध्ये अत्यंत महत्त्वाची ठरते. संविधानाप्रमाणे शासन तरी वागत आहे का?प्रत्येक माणसाला सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे आणि तो सन्मान मिळवून देण्याचे काम सरकारने करायचे आहे. परंतु शासकीय धोरणे जर शोषणाची केंद्रे बनली, तर शेतकरी आत्महत्या होतच राहणार. शासकीय धोरणेच जर शेतकऱ्यांच्या मरणाचे कारण ठरत असतील, तर या व्यवस्थेचे आत्मपरीक्षण होणे गरजेचे आहे.स्वातंत्र्यानंतरच्या काही वर्षांत देशाच्या जीडीपीमध्ये सर्वांत मोठा वाटा शेती व्यवसायाचा होता. परंतु सातत्याने या व्यवसायाकडे केलेल्या दुर्लक्षाचा परिणाम म्हणून आज जीडीपीमधील शेतीचा वाटा अत्यल्प झाला आहे. तसेच या व्यवसायाकडे मोठ्या प्रमाणात पाठ फिरवली जात आहे. आज देशातील सुमारे ५३ ते ५४ टक्के लोकसंख्या शेती आणि शेतीपूरक व्यवसायांवर अवलंबून आहे. पूर्वी ७५ टक्क्यांपेक्षा अधिक लोक या व्यवसायावर अवलंबून होते. स्वाभाविकच, रोजगाराच्या इतर संधी मर्यादित असल्याने मोठ्या प्रमाणावर लोक शेतीवर अवलंबून होते. सरकारची गत अशी झाली आहे की, हातचे देण्याचे सोडून पळत्याच्या मागे लागायचे! देशाचे खरे बलस्थान असलेल्या शेतीकडे दुर्लक्ष करून केवळ भौतिक सुखाकडे घेऊन जाणारा हा प्रवास घातक ठरत आहे त्यामुळे शासनाने आता तरी या विषयाकडे गांभीर्याने पाहून सक्षम भारत निर्माण करण्याचे काम करणे गरजेचे आहे. आणि ते केवळ शेतीला भक्कम पाठबळ देऊनच शक्य होऊ शकते, हे मात्र सत्य आहे.त्यामुळे या स्वातंत्र्यदिनी सरकारने आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. प्रामाणिकपणे किमान पाच वर्षे या विषयावर लक्ष केंद्रित करून सक्षम भारत निर्माण करण्याची गरज आता निर्माण झाली आहे. या व्यवसायाला पुन्हा तीच प्रतिष्ठा प्राप्त करून देणे हे सरकारचे दायित्व आहे. त्यामुळे खरे तर हे वर्ष 'शेतकरी सन्मान वर्ष' म्हणून साजरे व्हावे आणि बळीराजाला त्याची पूर्वीची प्रतिष्ठा पुन्हा मिळावी, हीच अपेक्षा या स्वातंत्र्यदिनी व्यक्त करावीशी वाटते.

# सौंदाळा येथे अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा ३७ वा स्थापना दिन साजरा




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : विचारांचा संघर्ष हा आजचा नाही तर अनंत काळापासूनचा संघर्ष आहे. चिकित्सा करणे आणि जसे आहे तसे स्वीकारणे असे वाचनाचे दोन प्रकार आहेत. चूक आहे की बरोबर,खरे खोटे याची चिकित्सा करायला शिकले पाहिजे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती ही कृतिशील उपक्रमातून कार्यकर्ता तयार करणारी आणि चिकित्सा करणारी वैचारिक संघटना असल्याचे प्रतिपादन अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य कार्यवाह बाबा आरगडे यांनी केले.

नेवासा तालुक्यातील सौंदाळा ग्रामपंचायत कार्यालयात रविवारी अंधश्रद्धा निर्मूलन समितीचा स्थापना दिन साजरा करण्यात आला. यावेळी मार्गदर्शन करताना आरगडे बोलत होते. सरपंच शरद आरगडे, अंनिसचे शोसल मीडिया जिल्हा कार्यवाह सुखदेव फुलारी, डॉ. अशोक ढगे, रामकृष्ण नवले, अप्पासाहेब वाबळे, बाळासाहेब आरगडे, भारत आरगडे, बी.के.चव्हाण, सचिन चौधरी, महिला सहभाग विभाग प्रमुख रेणुका चौधरी, पुष्पा आरगडे, सचिन आरगडे, बाबासाहेब बोधक,गोरक्षनाथ बोधक, यावेळी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते डॉ.नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. स्थापना दिनाचे औचित्य साधुन
अंनिसमध्ये ३७ वर्षाचे योगदान दिल्याबद्दल बाबा आरगडे यांचा तर समितीचे जिल्हा पदाधिकारी सुखदेव फुलारी यांना महाराष्ट्र शासनाचा विश्वकर्मा गुणवंत कामगार पुरस्कार जाहिर झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला.

डॉ. ढगे म्हणाले,डॉ. नरेंद्र दाभोळकर यांनी ९ ऑगस्ट १९८९ रोजी महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची स्थापना केली.अंनिस ही वैचारिक बैठक,वैचारिक बैठक असलेली चळवळ आहे. या संघटनेला सामाजिक कार्याची जोड आहे. समाज प्रबोधन व लोकशिक्षणाचे कार्य करणाऱ्या या चळवळीत तरुण पीढी यावी यासाठी उपक्रम राबविले जावेत असे आवाहन केले.

# दिवे गुरुजींचा पीएचडीपर्यंतचा प्रवास प्रेरणादायी : प्राचार्य डॉ. गायकवाड

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**निमगाव पागा** : ग्रामीण भागात शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे कार्य करत असतानाच ज्ञानलालसा कायम जागृत ठेवून पदवीधर शिक्षक संतोष दिवे यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून मराठी विषयात पीएचडी पदवी संपादन केली. त्यांचा हा प्रवास युवकांसह विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे प्रतिपादन संगमनेर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अरुण गायकवाड यांनी केले.

निमगाव पागा या छोट्या गावातून शिक्षण घेत दिवे यांनी शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करत डॉक्टरेटपर्यंत मजल मारली. 'नव्वदोत्तरीतील साहित्य युवा अकादमी पुरस्कारप्राप्त साहित्यकृतींचा अभ्यास' या विषयावर त्यांनी संशोधन केले. त्यांना मराठी विभागप्रमुख डॉ. अशोक लिंबेकर यांचे मार्गदर्शन लाभले.

लहित खुर्द येथे पदवीधर शिक्षक म्हणून कार्यरत असलेले दिवे हे प्रयोगशील व उपक्रमशील शिक्षक म्हणून परिचित आहेत. बी.ए., बीएससी., एम.ए., डी.एड., बी.एड., एम.एड., पत्रकारितेतील डिप्लोमा यांसह पीएचडी अशा विविध पदव्या त्यांनी संपादन केल्या आहेत. फलक लेखन, अवांतर वाचन, फिरती विज्ञान प्रयोगशाळा आदी उपक्रमांतून ते विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतात. पर्यावरण व मूल्यशिक्षणावरही ते व्याख्याने देतात.

त्यांच्या यशाबद्दल शिक्षण क्षेत्रातील अधिकारी, ग्रामस्थ, शिक्षक व विविध मान्यवरांनी अभिनंदन करून सत्कार केला.



# राज्य पत्रकार संघटनेच्या जिल्हा सरचिटणीसपदी जनार्दन जगताप; कोपरगाव तालुकाध्यक्षपदी विजय कापसे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : पत्रकारांच्या न्याय हक्कासाठी अहोरात्र कार्यरत असलेल्या राज्य पत्रकार संघ मुंबई या राज्यातील अग्रगण्य पत्रकार संघटनेच्या अहिल्यानगर जिल्हा सरचिटणीसपदी ज्येष्ठ पत्रकार जनार्दन जगताप, तर कोपरगाव तालुकाध्यक्षपदी पत्रकार प्रा. विजय कापसे यांची निवड करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेशाध्यक्ष निलेश सोमानी, राज्य संघटक संजय भोकरे, जिल्हाध्यक्ष अनिल कोळसे व जिल्हा निवड समिती अध्यक्ष सोमनाथ काळे यांच्या सूचनेनुसार निवड करण्यात आली असल्याची माहिती संघटनेचे प्रदेश सरचिटणीस डॉ विश्वासराव आरोटे यांनी दिली आहे.


विजय कापसे


जनार्दन जगताप

जनार्दन जगताप हे गेल्या ३० वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, आपल्या लेखणीच्या माध्यमातून सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहेत. पत्रकार संघटनेतही त्यांनी विविध पदांवर जबाबदारी सांभाळली आहे. मागील २ वर्षे त्यांनी तालुकाध्यक्ष म्हणून प्रभावीपणे काम करताना अनेक सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबविले. विशेषतः महिला दिनानिमित्त कोपरगाव तालुक्यातील सर्व अंगणवाडी सेविकांचा सन्मान करून त्यांनी राज्यभरात वेगळा आदर्श निर्माण केला होता. त्यांच्या कार्याची दखल घेत त्यांच्यावर आता जिल्हा सरचिटणीसपदाची महत्त्वाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

तर प्रा. विजय कापसे हे गेल्या ९ वर्षांपासून पत्रकारिता क्षेत्रात कार्यरत असून, आपल्या निर्भीड लेखणीच्या माध्यमातून अनेक उपेक्षित प्रश्नांना व विकासकामांना सातत्याने वाचा फोडत आहेत. ते पेशाने शिक्षक असून सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रातही त्यांचे उल्लेखनीय योगदान आहे.

# 'लक्षवेध' प्रज्ञाशोध परीक्षेतील गुणवंतांचा गौरव व 'राज्यस्तरीय पुरस्कार' सोहळा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : लक्षवेध फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षेत गुणवंत विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण आणि विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांचा पुरस्कार वितरण सोहळा श्रीरामपूर येथील उत्सव मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त गटशिक्षणाधिकारी संजीवन दिवे होते.

यावेळी लक्षवेध जीवन गौरव पुरस्कार समाजसेवक नारायणराव डावखर, नारीशक्ती पुरस्कार माजी नगराध्यक्षा इंदुमती डावखर, शिक्षण तज्ञ पुरस्कार संजीवन दिवे, प्रशासकीय अधिकारी पुरस्कार पोस्ट मास्तर




महेश कोबरणे, लक्षवेधी पत्रकार पुरस्कार संदीप पाळंदे, निवेदक पुरस्कार प्रसन्न धुमाळ तर आदर्श शिक्षक पुरस्कार अमोल इधाते यांना देऊन सन्मानित करण्यात आले.

याप्रसंगी राज्यकर उपायुक्त अनिल काळे, पीएसआय उमेश चव्हाण, रोहन डावखर, ॲड. शेळके, राजू इनामदार, योगेश देशमुख, लक्ष्मीकांत ईडलवार, शिक्षक बँकेचे माजी व्हा. चेअरमन नानासाहेब बडाख, सुजित बनकर हे मान्यवर उपस्थित होते.

# शिक्षक देशाचा खरा शिल्पकार : महंत सुनीलगिरी महाराज

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कुकाणा** : देशाचे भवितव्य घडविणारे शास्त्रज्ञ, अभियंते, डॉक्टर, राजकीय नेते, सामाजिक कार्यकर्ते आणि सक्षम नागरिक घडविण्याचे कार्य शिक्षक करतात. त्यामुळे शिक्षक हा देशाचा खरा शिल्पकार आहे, असे प्रतिपादन श्रीराम सेवा आश्रमाचे महंत सुनीलगिरी महाराज यांनी केले.

कुकाणा ग्रामसेवा मंडळ संचलित पाथरवाला माध्यमिक विद्यालयाचे क्रीडा शिक्षक तथा पत्रकार सुनील पंडित २७ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले. त्यानिमित्त कुकाणा व परिसरातील मित्रमंडळाच्या वतीने आयोजित सत्कार समारंभात महंत सुनीलगिरी महाराज बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य दादासाहेब वाबळे होते. आमदार विठ्ठलराव लंघे, नेवासा बाजार समितीचे दत्तात्रय खाटीक, काँग्रेसचे युवा जिल्हाध्यक्ष अभिजीत लुणिया आदी उपस्थित होते.

आमदार लंघे यांनी सुनील पंडित यांनी प्रामाणिकपणे ज्ञानदान करून अनेक विद्यार्थ्यांचे उज्ज्वल भवितव्य घडविले. पत्रकारिता, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील त्यांचे योगदानही उल्लेखनीय असल्याचे सांगितले.

यावेळी मित्रमंडळाच्या वतीने सुनील पंडित यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना पंडित यांनी शिक्षण संस्थेत काम करण्याची संधी मिळणे हे आपले भाग्य असल्याचे सांगितले. विद्यालयाला ज्ञानमंदिर व विद्यार्थ्यांना देव मानून आपण कार्य केले, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

कार्यक्रमास विविध क्षेत्रांतील मान्यवर, शिक्षक, ग्रामस्थ व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन भाऊसाहेब सावंत यांनी केले.

# सावता महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील सोनगाव येथे श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित ४१ वा अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न झाला. भागवताचार्य ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता झाली. यावेळी हजारो भाविकांनी उपस्थित राहून महाप्रसादाचा लाभ घेतला.

दि. ४ ते ११ ऑगस्टदरम्यान झालेल्या सप्ताहात अखंड हरिनाम, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, संगीतमय श्रीमद्भागवत कथा, काकडा, विष्णुसहस्रनाम, गाथा भजन, हरिपाठ, हरिजागर व संतपूजन आदी धार्मिक कार्यक्रम झाले. सप्ताहाच्या काळात टाळ-मृदुंगाचा निनाद आणि विठ्ठलनामाच्या जयघोषाने सोनगाव परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

ह.भ.प. मनोहर महाराज सिनारे यांनी काल्याच्या कीर्तनातून संत सावता महाराजांची विठ्ठलभक्ती, नामस्मरणाचे महत्त्व तसेच संतविचारांची आजच्या पिढीला असलेली गरज यावर मार्गदर्शन केले.यंदाच्या सप्ताहाचे विशेष आकर्षण म्हणजे गावातील तरुणाईचा उत्स्फूर्त सहभाग. आयोजन, नियोजन व व्यवस्थापनाची जबाबदारी तरुण कार्यकर्त्यांनी समर्थपणे सांभाळली. सप्ताहाचा शुभारंभ ह.भ.प. दत्तगिरीजी महाराज यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाला होता. सप्ताहाच्या यशस्वीतेसाठी संत सावता महाराज मंदिर समिती, भजनी मंडळ, तरुण कार्यकर्ते व ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.




# लांडेवाडीत बिबट्याचा धुमाकूळ; शेळी ठार, कुत्रा जखमी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनई** : सोनई जवळील लांडेवाडी शिवारात बिबट्याने धुमाकूळ घातला असून, बिबट्याच्या हल्ल्यात गाभण शेळी ठार तर पाळीव कुत्रा जखमी झाल्याची घटना घडली. या घटनेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बिबट्याचे वारंवार दर्शन होत असल्याने शेतकरी रात्री व पहाटेच्या वेळी शेतात जाण्यास धजावत नसल्याचे चित्र आहे.

लांडेवाडी शिवारातील रमेश लिपाने यांच्या वस्तीवरील पाळीव कुत्र्यावर बिबट्याने हल्ला केला. या हल्ल्यात कुत्रा जखमी झाला असून पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. धाडगे यांनी घटनास्थळी पाहणी करून त्याच्यावर उपचार केले. त्यानंतर शरद दरंदले यांच्या घरासमोर बांधलेल्या शेळ्यांवर बिबट्याने हल्ला केला. यामध्ये सुमारे १५ हजार रुपये किमतीची गाभण शेळी ठार झाली.

या घटनेचा तातडीने पंचनामा करून नुकसानग्रस्त कुटुंबाला शासनाकडून आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी रमेश लिपाने यांनी केली आहे. यापूर्वीही डॉ. ज्ञानेश्वर दरंदले यांचा पाळीव डॉबर कुत्रा बिबट्याच्या हल्ल्यात ठार झाल्याची घटना घडली आहे. परिसरातील शेतकऱ्यांना रात्री व पहाटेच्या वेळी शेतात बिबट्याचे दर्शन होत असल्याचे सांगण्यात येत आहे. त्यामुळे शेतीची मशागत, पिकांना पाणी देणे यासारखी कामे प्रभावित झाली असून शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे.

# राहाता तालुक्यात अवैध वाळू वाहतुकीवर छापा

## दोन डंपरसह ३० लाखांचा मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : राहाता तालुक्यातील नपावाडी परिसरात अवैध वाळू वाहतुकीविरोधात स्थानिक गुन्हे शाखेने धडक कारवाई केली. या कारवाईत दोन डंपर आणि त्यातील अवैध वाळूसह एकूण ३० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दोन चालकांना पोलिसांनी रंगेहात ताब्यात घेतले असून, त्यांच्याविरुद्ध राहाता पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



नपावाडी परिसरातून बेकायदेशीर वाळूची वाहतूक होणार असल्याची गोपनीय माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी परिसरात सापळा रचून संशयास्पदरीत्या येणारे दोन डंपर अडवले. तपासणी केली असता दोन्ही वाहनांमध्ये विनापरवाना उपसा केलेली वाळू आढळून आली.

या कारवाईत विशाल नितीन कोल्हे (२१, रा. गणेशवाडी, शिर्डी) आणि दौलत एकनाथ सोनवणे (४०, रा. केलवड, ता. राहाता) यांना ताब्यात घेण्यात आले. दोन्ही डंपर व वाळू असा ३० लाख ४० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. पुढील तपास राहाता पोलीस करीत आहेत.

# घोडेगाव येथे कांद्याला ३८ रुपये प्रति किलोचा भाव, आवक घटली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**घोडेगाव** - कांदा खरेदी विक्री त्याचबरोबर मोठ्या प्रमाणात आवक येणाऱ्या महाराष्ट्रातील प्रसिद्ध असलेल्या नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीच्या घोडेगाव येथील उपवारात बुधवार (दि.१२) रोजी झालेल्या लिलावात उत्तम प्रतीच्या एक अर्ध्या वकल साठी कांद्यास ३८ रुपये प्रति किलोचा भाव मिळाल्याची माहिती कांदा आडतदार सुयश कलंत्री यांनी दिली.

गेल्या तीन-चार वर्षापासून घसरलेल्या दरामुळे अडचणीत आलेल्या कांदा उत्पादक शेतकऱ्यांना सध्या जेमतेम उत्पादन खर्च निघेल असा दर मिळत असल्याने कांदा उत्पादक शेतकऱ्यांमध्ये समाधान व्यक्त केलं जात आहे. घोडेगाव येथील उपवारात शनिवार रोजी झालेल्या लिलावात एका अर्ध्या वक्लक साठी ३८ रुपये किलो प्रति दर मिळाला तर सरासरी २६ ते २९ रुपये प्रति किलोचा दर मिळाला आहे. उपवारात एकूण ४४ हजार तीनशे ४८ गोण्यांची आवक झाली होती यात एक नंबर गोळामालास ३० ते ३२ रुपये दर तर दोन नंबर मलास २७ ते २९ रुपये प्रति किलो दर मिळाला तर गोल्टा मालास २४ ते २७ रुपये व गोल्टी मालास २०ते २२ रुपये प्रति किलो दर मिळाला तर कमी कलर व डॅमेजमालास १० ते १८ रुपये प्रति किलोचा दर मिळाला.



**घोडेगाव उपवारातील शरद सोनवणे यांच्या आडतीवर सुरू असलेला कांद्याचा लिलाव.( छाया सोपान भगत)**

इतर राज्यात कांद्याचे मोठ्या प्रमाणात उत्पन्न असल्याने पुढील काळात कांद्याचे दर कोसळतील या अफवांनवर शेतकऱ्यांनी कुठलाही विश्वास ठेवू नये कर्नाटक व आंध्र प्रदेश येथे कांद्याचे उत्पन्न अतिशय कमी प्रमाणात असल्याने पुढील काही दिवसात कांद्याचे आणखी दर वाढ होऊ शकते त्यामुळे शेतकऱ्यांनी कांदा थोड्या थोड्या प्रमाणात विक्रीसाठी आणावा

**( शरद सोनवणे**
**कांदा आडतदार घोडेगाव )**

यावर्षी ऐन कांदा काढणीच्या वेळी पाऊस आल्यामुळे जवळपास ७० टक्के शेतकऱ्यांचा कांदा खराब झाला आहे त्यामधून शेतकऱ्यांकडे थोड्याफार प्रमाणात राहिलेला कांदा सध्या बाजारात येत आहे त्यामुळे आवक घटली आहे मात्र यातून शेतकऱ्यांचा खूप मोठा फायदा होईल असं वाटत नाही

**(साईनाथ निकम**
**कांदा उत्पादक शेतकरी देवगाव)**

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )